नि.फौ. क्र. १४७/२०१९
<u>नि. क्र. ३२</u>

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१**
शपथेवर सत्य निवेदन करते की,

**नाव** – **गीता विठ्ठल कापसे**
**वय** – ४० वर्षे, **व्यवसाय**– शेती,
**राहणार** – रेतु उमरगा, ता. जळकोट, जि. लातूर.

**<u>अभियोग पक्षातर्फे सरतपास सहा. सरकारी विधिज्ञ श्री. के. टी. उगलमुगले यांचेमार्फत शपथेवर सुरू.</u>**

दिनांक ०८/०६/२०१९ रोजी सकाळी ०९.३० वाजता मी शेतात होते. ते शेत माझ्या घराच्या पाठीमागे आहे. मी शेतात नांगरणी करीत असताना आरोपी तेथे आले व मला म्हणाले की, 'तु शेत का नांगरत आहेस'. त्यानंतर आरोपी क्र.१ संजय याने माझ्या डोक्यात काठी घातली. दाजिबा याने लाथाबुक्क्यांनी मला मारहाण केली. आरोपी क्र.३ राजू याने मला दाबून धरले. आरोपी क्र.४ विजयने मला शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. भांडण चालु असताना माझा मुलगा तुकाराम विठ्ठल कापसे हा घरातून घटनास्थळी आला. त्याने भांडण सोडविले. त्या ठिकाणी संदिप राम चव्हाण व बापुराव तेथे आले. त्यांनी देखील भांडण सोडविण्यास मदत केली.

२. भांडण सोडविल्यानंतर मी जळकोट पोलीस ठाण्यात गेले. पोलिसांनी मला पत्र दिले आणि सरकारी दवाखान्यात पाठविले. त्या ठिकाणी मी उपचार घेतले. त्यानंतर परत मी जळकोट पोलीस ठाण्यात गेले व फिर्याद दाखल केली. आता मला दाखविण्यात आलेली फिर्याद तीच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. त्या फिर्यादीस **नि.क्र.३३** देण्यात येते.

**मुद्देमाल उपलब्ध नसल्याने उर्वरित सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

Digitally signed by KRISHNADEO ANKUSH YADAV
Date: 2026.04.16 17:52:17 +05'30'

**( के. ए. यादव )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.२) उदगीर

दिनांक : १६/०४/२०२६